ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निर्धारित करण्यासाठी "शिक्षण शुल्क समिती" गठीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.८९/२०/शिक्षण-१

९ वा मजला, नवीन मंत्रालय, गो. ते. रूग्णालय आवार, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१

दि. ०५ ऑगस्ट, २०२५

संदर्भ :-

१. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५
२. शासन अधिसूचना क्रमांकः एनयुआर २०१८/प्र.क्र.१४५/१८/शिक्षण १. दि. ३०.१०.२०१८
३. समक्रमांकित शासन पत्र दि. १९.०३.२०२१
४. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र, क्र.एफआरए-२०२२/प्र.क्र.१३९/तांशि-४, दि.०३.११.२०२२
५. शासन निर्णय समक्रमांक दि.१३.१२.२०२२

**प्रस्तावना:**

राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी विना अनुदानित परिचर्या महाविद्यालयातील ए.एन.एम.. जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांचे शुल्क निर्धारण करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या स्तरावर "शिक्षण शुल्क समिती" स्थापन करण्यास व सदर समितीकडून ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांचे शुल्क निर्धारण करण्यास उपरोक्त संदर्भ क्र.५ येथील दि.१३.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदर शिक्षण शुल्क समितीची रचना, कार्यकाल, कार्यकक्षा व जबाबादारी निश्चित करण्यात आली आहे. सदर समितीमधील तत्कालीन सदस्य सचिव श्रीम. वैशाली सुळे यांची बदली झाल्याने सदर समितीवर अन्य सदस्य नेमण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-:**

उपरोक्त संदर्भ-५ येथील दि.१३.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील अ.क्र.२ येथील (अ) समितीची रचना या परिच्छेद तक्त्यात "सदस्य सचिव" म्हणून श्रीम. वैशाली सुळे, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्याऐवजी उप सचिव (समन्वय), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

२. संदर्भाधीन क्र.५ येथील शासन निर्णयातील उर्वरित तरतूदी कायम राहतील.

(डॉ. तुषार पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत:**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई,
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
४. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

५. मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधानभवन, मुंबई
८. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधानभवन, मुंबई
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
१०. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई
११. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, मंत्रालय, मुंबई
१३. सचिव, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार निर्माण भवन, नवी दिल्ली.
१४. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई
१५. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
१६. उपसचिव (समन्वय), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई
१७. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
१८. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई,
१९. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई
२०. संचालक, महाराष्ट्र शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई
२१. अधिक्षिका (शुश्रृषा), वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
२२. प्रबंधक, महाराष्ट्र शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई
२३. प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई
२४. निवडनस्ती (शिक्षण १)